UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

वर्ष : ९१ • डिसेंबर २०२३ • पुरवणी विशेषांक ०९

G20
भारत 2023 INDIA

स्थापना : १ जानेवारी १९२७

प्रकाशक : इतिहासाचार्य वि.का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

ISSN No. 2394-5990


१२. 'कुसुमाग्रजांची कविता : सत्य, शिव, सौंदर्य, विश्वशांती आणि प्रगतीचे अधिष्ठान'

- डॉ.विद्या विजय नावडकर ---------------------------------------------------------------- ४६

१३. जागतिक शांतता व प्रगतीसाठी गौतम बुद्ध,मदर तेरेसा आणि नेल्सनमंडेला यांचे योगदान

- डॉ. शुभांगी तानाजी कुंभार ---------------------------------------------------------------- ५२

१४. जागतिक शांतता व प्रगतीसाठी भारतीय संस्कृतीचे योगदान

- प्राप्ती महेंद्र गावकर ---------------------------------------------------------------- ५६

१५. जागतिक शांतता व प्रगतीसाठी स्त्री आणि संस्कृतीचे योगदान!

- श्री.यशेंद्र प्रभाकर क्षीरसागर ---------------------------------------------------------------- ६०

१६. जागतिक शांतता आणि प्रगतीसाठी मराठी कादंबरीकारांचे योगदान

- डॉ.चंद्रकांत शंकर कांबळे ---------------------------------------------------------------- ६४

१७. 'पसायदान': विश्वशांतीची प्रार्थना

- प्रा. डॉ. पांडुरंग ऐवळे ---------------------------------------------------------------- ६८

१८. जागतिक शांतता व प्रगतीसाठी मराठी भाषा व साहित्यिकांचे योगदान

- प्रा. डॉ. दिलीप महादू कोने ---------------------------------------------------------------- ७१

१९. महात्मा फुल्यांचा शांततेचा संदेश

- डॉ. आबासाहेब उमाप ---------------------------------------------------------------- ७४

२०. 'जागतिक शांतता आणि गौतम बुद्ध'

- प्रा. महेश नारायण आवळे ---------------------------------------------------------------- ७७

२१. संत साहित्यातील विश्वात्मक भाव

- डॉ. गणेश दिगंबर सावजी ---------------------------------------------------------------- ८०

२२. जागतिक शांतता व प्रगतीसाठी संत तुकारामांचे योगदान

- डॉ. केशव रामभाऊ मोरे ---------------------------------------------------------------- ८४

२३. महात्मा जोतिराव फुले यांच्या साहित्याचे विश्वशांती व विकासासाठीचे योगदान

- डॉ. कांचन विजय नलावडे ---------------------------------------------------------------- ८७

# 'पसायदान': विश्वशांतीची प्रार्थना

**प्रा. डॉ. पांडुरंग ऐवळे**
प्रमुख, मराठी विभाग,
बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण.
फोन - ७५८८२२१०१०.
drpjaivale@gmail.com

मध्ययुगीन महाराष्ट्रामध्ये 'भागवत' धर्माची स्थापना करून ज्ञानदेवांनी महाराष्ट्राच्या जीवनामध्ये एका नव्या युगाचा प्रारंभ केला. ब्रम्हात्मऐक्यभाव, समदृष्टीने विश्वाकडे पाहण्याची भावना, दिन दलितांचा उद्धार, सर्व प्राणीमात्रांविषयी आत्मीयता, अद्वैतदृष्टी आणि लोकभाषेचा वापर करून या भागवत धर्माचा पाया त्यांनी घातलेला होता. ज्ञानेश्वरांनी 'मऱ्हाटीयेच्या नगरी'मध्ये 'ब्रह्मविद्येचा सुकाळु' करण्यासाठी 'साहित्यसोनियाच्या खाणी' 'ज्ञानेश्वरी'च्या रूपाने उघडलेल्या आहेत. 'ज्ञानेश्वरी' रुपी वाङ्मययज्ञ पूर्ण केल्यानंतर 'पसायदान' म्हणजे कृपाप्रसाद मागितला आहे. ''ज्ञानेश्वरीचा पहिला अध्याय हा 'मुखाध्याय' आहे. तर अठरावा अध्याय हा 'कळसाध्याय' आहे. अशा पद्धतीने ज्ञानदेवांनी भावार्थदीपिकेचे ज्ञानमंदिर उभारलेले आहे. 'ॐ नमोजी आद्या' पासून ज्ञानेश्वरीला सुरुवात झाली. आणि 'आता विश्वात्मक देवे' म्हणून 'येणे वरी ज्ञानदेवो सुखिया जाहला' अशी अखेर झाली. आत्मरुपापासून विश्वरूपापर्यंतचा हा प्रवास आहे. या प्रवासाची अखेर अठराव्या अध्यायातील 'पसायदानाने' होते.''[१]

पसायदान मागत असताना त्यांनी 'आता विठ्ठल देवे, ब्रह्मा देवे, सिद्ध्येश्वर देवे' असे म्हटले नाही. येथे कोणाही विशिष्ट देवतेचे नाव घेतलेले नाही. कोणत्या विशिष्ट पंथाचाही निर्देश केलेला नाही. ज्ञानेश्वरांनी ज्या विश्वात्मक देवाकडे प्रसाद मागितला आहे ते म्हणजे गूरु 'श्री निवृत्तीनाथ' आहेत. धर्म, पंथ तर सोडाच, पण प्रांत, देश.काळ या पलीकडे जाऊन त्यांनी दान मागितले आहे. विश्वातील सर्वांसाठी आणि सर्वकालीन मानवजातीच्या शांतीसाठी व कल्याणासाठी केलेली ही प्रार्थना आहे. ज्ञानेश्वरीतील विचार सारांशरूपाने 'पसायदानात' मांडलेला आहे. या संदर्भात कुसुमाग्रज म्हणतात, ''ज्ञानेश्वरीतील पसायदान म्हणजे ज्ञानेश्वरीच्या उत्तुंग देवालयावरील कांचनाचा कळस आहे.'' प्रसाद मागणारा 'मी'; पण जे मागितले आहे, त्यात 'मी'चा लवलेशही नाही. माउली प्रार्थना करताहेत ती अखिल विश्वातील चराचरांसाठी. त्यामुळे विश्वात्मक परमात्म्यालाच साद घातली पाहिजे ही माउलींची इच्छा असावी. ज्ञानेश्वर हे विश्वमानव असल्यामुळे त्यांचे मागणेही अत्यंत व्यापक व विश्वव्यापी स्वरुपाचे आहे. त्यामुळे हे केवळ मागणे नव्हे तर विश्वशांतीची प्रार्थनाच आहे. ''अवघाची संसार सुखाचा करीन । आनंदे भरीनतिन्ही लोक । अशा उमेदीने आणि सहसंवेदनेने त्यांनी आपले उभे आयुष्य लोककल्याणार्थ झिजवले.''[२]

ज्ञानेश्वरीच्या१८ व्या अध्यायात आपण केलेल्या ज्ञानेश्वरीरूपी वाग्यज्ञाचे फल स्वरूप म्हणून फक्त नऊ ओव्यातून हे पसायदान मागताना ते म्हणतात, 'आता' विश्वात्मक देवाने, या माझ्या वाग्यज्ञाने प्रसन्न व्हावे आणि मला पसायदान द्यावे. ''आता' हे उभयान्वयी अव्यय आहे. ते दोन शब्दांना जोडते. पण इथे तर ओवीची सुरुवातच 'आता' ने केली आहे. हे उभयान्वयी अव्यय चरणाच्या आधी आल्यामुळे त्याच्या आधी कुणाला तरी जोडले असेल. म्हणूनच तो आपल्या जीवनाला जोडणारा शब्द आहे.''[३]

**जे खळांची व्यंकटी सांडो । तयां सत्कर्मी रती वाढो ।।**
**भूतां परस्परें जडो । मैत्र जीवांचें ।।**

जेथे श्रीकृष्णानी 'विनाशायच दुष्कृताम्' साठी मी जन्म घेतो असे म्हंटले, त्याकडे ज्ञानेश्वरांनी प्रेमबुद्धीने पहिले आहे. दुष्टांच्या अंतःकरणामधील कुटिलपणा जावा, कुटिलपणा गेल्यानंतर त्यांच्यात सत्कर्माविषयी रती वाढून त्यांच्या हातून सत्कर्मे घडावीत, अवघ्या प्राणिमात्रांची परस्परांशी मैत्री व्हावी आणि त्यामुळे अवघ्या प्राणिमात्रांचे कल्याण व्हावे अशा तीन गोष्टी या ओवीमध्ये संत ज्ञानेश्वरांनी मागितल्या आहेत. 'स्वधर्म' आणि 'सत्कर्म' ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.स्वधर्म आचरला तरच त्याला सत्कर्म म्हणता येईल. व्यक्तिगत स्वार्थासाठी केलेले कर्म ते दुष्कर्म असते . लोककल्यासाठी केललेले कर्म सत्कर्म असते. ज्याला आत्मोन्नती साधायची आहे त्याने आपल्यातील वाईट प्रवृत्तींचा नाश करायला हवा. सत्संगतीने स्वभावदोष दूर होऊ शकतात. सर्वांबद्दल प्रीती वाढते.

ISSN No. 2394-5990

असे घडले तर व्यक्ती, समाज, देश आणि विश्व यांचे ऐक्य होण्यास उपयोगी ठरेल. सर्वत्र सर्वमंगल निर्माण व्हायचे असेल, तर अगोदर ही खलवृत्ती नष्ट व्हायला हवी; म्हणून पसायदानातील पहिला उल्लेख आहे, तो 'खळांच्या व्यंकटीचा' तो दूर केला तरच रस्ता स्वच्छ होईल. उद्दिष्टाकडे जाण्याचा प्रवास सुखकर होईल. अशा व्यापक स्वरुपात मित्रभाव निर्माण झाला तर सर्वत्र विश्वशांती अनुभवास येईल.

'दुरिताचें तिमिर जावो' पापी माणसाचा अज्ञानरुपी अंधार नाहीसा होवो, विश्वात स्वधर्मरूपी सूर्याचा उदय होवो. प्राणीमात्रांच्या मंगल इच्छा पूर्ण होवोत. येथे तीन मागण्या आहेत. पापरुपी अंधार नाहिसा होऊ दे, स्वधर्मरुपी सूर्य उदयाला येवो. आणि तिसरी मागणी विश्वातील सर्व प्राणिमात्रासाठी आहे. जो जे वांछील म्हणजे ईच्छा करील ती वस्तू किंवा गोष्ट त्याला प्राप्त होवो. मानवाचा धर्म 'माणुसकीचा' हा प्रत्येकाने मानला तर त्याच्या प्रकाशाने विश्वातील प्रत्येकाचे जीवन उजळून निघेल. त्यामुळे ज्याला ज्याला जे जे हवे ते मिळेल, येथे माउलींनी जगातील सर्वच प्राणिमात्रांच्या धर्माची ग्वाही दिली आहे.

दुरिताचें तिमिर गेले की, सर्व प्रकारच्या मंगलांचा, कल्याणाचा वर्षाव करणाऱ्या ईश्वरनिष्ठ संतांची मांदियाळी पृथ्वीवर अवतरत जावो आणि प्राणिमात्रांना निरंतर भेटत राहो असेही मागणे मागितले आहे. कारण हा ईश्वरनिष्ठांचा फक्त समुदाय नसून जणू काही नाना फुलाफळांनी बहरलेली उपवने आहेत. ही उपवने इच्छिलेले फळ देणाऱ्या कल्पवृक्षांची आहेत. संत हे चालते, बोलते कल्पतरू आहेत. संतरुपी चिंतामणी जनकल्याणासाठीं भक्तीचे अमृत कुंभ घेऊन अमृत वाटत निघाले आहेत. हा संत समुदाय अमृताचा महासागर आहे.

पौर्णिमेचा पूर्ण चंद्र जरी बघितला तरी त्याच्यावर डाग आहे. पण संत निष्कलंक असतात. ते ज्ञानाचा प्रकाश देऊन अविद्येचा सौम्यपणे नाश करतात. पूर्ण चंद्राच्या शीतल चांदण्यांचा ते वर्षाव करतात. संतांच्या ठिकाणी चंद्राचा कलंक नाही आणि सूर्याची दाहकताही नाही. संत सदा परिपूर्णच आहेत. त्यांच्या संगतीत आलेल्यांची दुःखे पूर्णतः नाहीशी करतात. असे संत आपले सोयरे झाले तर मग काय होईल ?

तिन्ही लोक सर्व सुखांनी परिपूर्ण होऊन अखंडितपणे त्यांनी विश्वाच्या आदिपुरुषाची सेवा करावी. ज्याच्या चित्तांत निरंतर समाधान, शांती असते त्यांना संत म्हणावे. ही शांती कोणत्याही बाह्य गोष्टींवर, वस्तूंवर, चित्ताच्या लहरीवर, प्रवृतींवर अवलंबून नसते. आपल्या व संतांच्या सुखाच्या कल्पना वेगवेगळ्या आहेत. आपली सुखे स्वत:पुरती मर्यादित असतात तर संतांचे सुख विश्वात्मक, विश्वाच्या कल्याणासाठी व शांतीसाठी असते. ''जीवात्मा परमात्मा झाल्यानंतर त्याला जी अनुभूती येते त्याला सुख म्हणायचे. अशी ज्ञानेश्वरांनी सुखाची व्याख्या केली आहे.''[४]

'ग्रंथोपजीवियें' म्हणजे ग्रंथ हेच तुमचे जीवन होऊन जावो. किंवा तुमचे जीवन ग्रंथरुप होऊन जावो. ग्रंथामध्ये वर्णिलेला आत्मसाक्षात्कार प्रत्यक्ष अनुभवास येवो. जो मनुष्यदेह लाभलेला आहे तो अत्यंत क्षणभंगूर आहे पण आत्मोन्नतीसाठी जो ग्रंथाचे अध्ययन करतो, तो दृष्ट व अदृष्ट दोन्हीवर विजयी होतो. सगळ्या मानवांची प्रकृती हळूहळू संस्कृतीकडे वळावी. लोककल्याणाचा मार्ग त्यांना दिसावा. या संदर्भात डॉ. राम शेवाळकर म्हणतात, ''ज्या कोणाला जेव्हा जेव्हा आदर्श समाजरचना निर्माण करावयाची असेल, त्यांच्याकरता या नऊ ओव्यांच्या रूपांनी ज्ञानेश्वरांनी एक आयतं 'निलचित्र' उपलब्ध करून दिलेले आहे. त्यामुळेच हे पसायदन एक 'विश्वगीत' होण्याच्या पात्रतेचं ठरलेलं आहे.''[५]

'येथ म्हणे श्रीविश्वेश्वरावो । हा होईल दानपसावो' या मागण्याने विश्वाचा रावो जो प्रत्यक्ष आदिपुरूष सदुरु निवृत्तिनाथांच्या रुपाने प्रकटला आहे. तो विश्वेश्वर संतुष्ट झाला आणि 'तथास्तु', म्हणून 'हा होईल दानपसावो' म्हणाला. तो कृपाप्रसाद सर्वांना लाभेल असे वरदान सदुरुंकडून मिळाले त्यामुळे ज्ञानेश्वरांना अतीव सुख झाले.

खरे तर वेद ज्ञान संपन्न असूनही त्यांच्यासारखे कृपणही कोणी नाही कारण ते फक्त त्रिवर्णीकांनाच उपदेश करतात.

**'वेदु संपन्न होय ठाई । परी कृपणू ऐसा आनु नाही ।**
**जे कानी लागला तिही । वर्णाचिया ।।'**

मात्र ज्ञानेश्वरांनी सर्वांना सामावून घेतले आहे. गीता उदार आणि व्यापक आहे. म्हणूनच 'स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेपी यान्ति परा गतिम' अशी भूमिका घेऊन स्त्री शुद्रादिकांनाही मोक्षाची कवाडे खुली करून दिली. 'यारे या यारे लहान थोर। याती भलते नारी नर । अशी साद घातली म्हणूनच समाजाच्या सर्व स्तरातून संत निर्माण झाले आणि आध्यात्मिक लोकशाहीला प्रारंभ झाल्याचा दिसतो.

''दुष्कर्म नाहीसे होऊन सर्व विश्व आपापल्या कर्तव्याच्या जाणिवेने कार्यरत असणे अपेक्षित आहे. इच्छा कोणतीही असो, व्यक्तीच्या वा समाजाच्या जीवनात त्यामुळे संघर्ष होता कामा नयेत. मानवी मनाला आंतरिक आनंद लाभावा, सर्वांना अनन्य साधारण शांती मिळावी यासाठी ही प्रार्थना आहे.''[६]

**समारोप :**

ज्ञानेश्वरांनी जसे पसायदान मागितले तसा संत नामदेवांनी आकल्प आयुष्य व्हावे तयां कुळा । माझिया सकळां हरिच्या दासां ।। असा कृपाप्रसाद मागितला. संत तुकाराम म्हणतात,

हें चि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा संताचे हे पसायदान व्यक्तिगत हितासाठी नाही तर अखिल जीवसृष्टीच्या कल्याणासाठी, शांतीसाठीच्या या प्रार्थना आहेत. ज्ञानेश्वरांची वाणी सार्वकालिक होऊन कशी 'अमर' ठरते. त्याचे 'पसायदान' हे उत्तम उदाहरण ठरले आहे.

मानवजातीच्या व्यवहारातील सर्व अनिष्ट ज्या प्रवृत्तीतून उत्पन्न होतात ते 'खलत्व'. माणसांची ही खलवृत्ती व्यक्तिगत व सांघिक स्वरूपात कार्य करीत असते. सर्वत्र शांतीची स्थापना व्हायची असेल तर हे खलत्व प्रथम नष्ट व्हायला हवे. ही खलवृत्ती निसर्गदत्त नसून परिस्थितजन्य आहे. खलत्व नाहीसे झाले की, मैत्र म्हणजे निःस्वार्थी, सर्वव्यापी प्रेम हाच मानवी जीवनाच्या शांतीचा , संस्कृतीचा मार्ग होईल. भारतातील सर्व संतांनी हाच संदेश जगाला दिला आहे. माणसाने स्वतःला स्वैराचाराने पशुवत न बनविता सत्कर्म, स्वधर्म, ईश्वरनिष्ठ संतांचा उपदेश, ईश्वरभक्ती या मार्गाने प्रथम मानव, मग मन आणि देव बनवावे. हीच खरी मानव जातीची प्रगती व उत्क्रांती आहे. "ज्ञानदेवांनी पसायदानात मांडलेली समाजतंत्रांची, राज्यतंत्रांची, विश्वकल्याणाची व विश्वशांतीची कल्पना भव्य व उदात्त आहे आणि विश्वाला शांतीकडे नेणारी आहे. स्वधर्माचरण हा भारतीयांचा परंपरेने चालत आलेला वारसा आहे. भारतात स्वधर्म सूर्याचा उदय झाला तरी सुद्धा त्याचा प्रकाश दशदिशेला असलेल्या इतर राष्ट्रात पडेल व अखिल विश्वात ज्ञान सुप्रभात होईल."[७]

ज्ञानेश्वरांनी जे मागितले ते विश्वाच्या सुखशांतीसाठी, प्राणीमात्र आणि चराचरसृष्टीच्या भल्यासाठी. याचीच तर आज आवश्यकता आहे. एकीकडे जग युद्धाच्या खाईत आहे. देशादेशांत, प्रांताप्रांतांत, समजा-समाजात, धर्मा-धर्मात आणि जाती-जातीतदेखील अविश्वासाची, संघर्षाची मनस्थितीत असताना 'पसायदान' हे जागतिक शांततेच्या दृष्टीने किती महत्वाचे आहे याची प्रचीती येते.

**संदर्भ :**

१. डॉ. उषा मा, देशमुख, : 'बापरखुमादेवीवरू' -मार्च-२००५. पृ.८९
२. र. बा.मंचरकर, : 'ज्ञानेश्वरी अध्याय-१,' मेहता पब्लिर्शिग हाऊस, पुणे. पृ.२३
३. दाजी पणशीकर, : 'पसायदानातील 'आता'! - आंतरजालावरुन
४. नाना महाराज साखरे, : 'सार्थ ज्ञानेश्वरी'धार्मिक प्रकाशन, मुंबई .
५. राम शेवाळकर : https://youtu.be/S98vgUS7CU? si=uS5g6RFISEySdcgU link
६. शंकर अभ्यंकर : 'पसायदान'- आंतरजालावरून
७. ह.भ.प. शंकरमहाराज खंदारकर, : 'श्रीज्ञानदेवांचे पसायदान' -विश्वस्त संस्थेचे प्रकाशन -१९९६ पृ. ४८